सकाळ पुणे शहर TODAY

सोमवार, २२ ऑक्टोबर २०१२ ३

# असेन मी नसेल मी, तरी असेल गीत हे

## कवयित्री शांता शेळके यांना अजरामर गीतांची स्वरांजली; शुभांगी मुळे यांचा सत्कार

**पुणे, ता. २१ :** 'असेन मी नसेल मी, तरी असेल गीत हे, फुलाफुलांत येथल्या उद्या हसेल गीत हे...', 'काय बाई सांगू, कसं ग सांगू...', 'दाटून कंठ येतो...', 'वादळ वारं सुटलं ग...', 'पप्पा सांगा कुणाचे...' अशा विविध अजरामर गीतांच्या माध्यमातून पुणेकरांना कवयित्री शांता शेळके यांचा सुरेल काव्यप्रवास अनुभवता आला.

निमित्त होते आडकर फाउंडेशनतर्फे आयोजित गायिका शुभांगी मुळे यांच्या सत्कार समारंभाचे. पाचशेव्या संगीत मैफलीनिमित्त त्यांचा 'सकाळ'चे वृत्तसंपादक माधव गोखले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यानंतर 'असेन मी नसेल मी' या मैफलीत भावगीतांपासून चित्रपट गीतांपर्यंतचे विविध गीतप्रकार आपल्या लेखणीतून सहजतेने साकारणाऱ्या शांताबाईंची अजरामर गीते शुभांगी मुळे यांनी सादर केली अन् शनिवारची सायंकाळ शांताबाईंच्या काव्यमय आठवणीत रंगून गेली.

मुळे म्हणाल्या, "गायकीसाठी लागणारा 'आवाज' आहे का, हे प्रथम माहीत नव्हते. पण, गुरूंच्या आशीर्वादामुळे आणि कुटुंबीयांच्या पाठिंब्यामुळे मला संगीत शिकता आले. आजवरील सांगीतिक वाटचालीत रसिकांचेही भरपूर प्रेम मिळाले. म्हणूनच गाणे गुणगुणत आहे." या वेळी 'मसाप'च्या कार्याध्यक्षा डॉ. माधवी वैद्य, 'सकाळ'च्या जनसंपर्क विभागाचे सरव्यवस्थापक विवेक कुलकर्णी, फाउंडेशनचे अध्यक्ष ॲड. प्रमोद आडकर उपस्थित होते. अंजली महागावकर, नीना भेडसगावकर यांनी सूत्रसंचालन केले.




**पत्रकार भवन :** आडकर फाउंडेशनतर्फे आयोजित समारंभात गायिका शुभांगी मुळे यांचा 'सकाळ'चे वृत्त संपादक माधव गोखले यांच्या हस्ते शनिवारी सत्कार करण्यात आला. या वेळी (डावीकडून) डॉ. माधवी वैद्य, प्रमोद आडकर, मुळे, गोखले व विवेक कुलकर्णी.